नारायणपूर येथील 'ती' जमीन औद्योगिक क्षेत्र घोषित

पालकमंत्र्यांच्या पाठपुराव्याने शेतकऱ्यांना न्याय

◆ **अमरावती, १ एप्रिल**

राज्य शासनाच्या उच्चाधिकार समितीने नारायणपूर येथील खाजगी ४७.८९ हेक्टर क्षेत्र संपादित करण्यास मंजुरी दिली. त्यानुसार नारायणपूर येथील ही जागा औद्योगिक क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आली आहे. तशी अधिसूचना उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने काढली असून, राजपत्रही प्रसिद्ध करण्यात आले आहे.

औद्योगिक वसाहतीच्या सांडपाण्याने बाधित नारायणपूर येथील जमिनीचा प्रश्न महिला व बालविकास मंत्री तथा अमरावतीच्या पालकमंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांच्या पाठपुराव्याने निकाली निघाला असून, शेतकऱ्यांना न्याय मिळाला आहे. नारायणपूर येथील ४७.८९ हेक्टर क्षेत्र संपादित करण्याबाबत राज्य शासनाच्या उच्चाधिकार समितीने यापूर्वीच मंजुरी दिली असून, त्याविषयीचे राजपत्रही प्रसिद्ध करण्यात आले आहे. अमरावती शहरापासून १७ किलोमीटर अंतरावर अतिरिक्त अमरावती औद्योगिक क्षेत्रातील टेक्स्टाईल झोनमधील सांडपाणी प्रक्रिया केंद्राच्या पाण्यामुळे शेतकऱ्यांच्या जमिनी नापिक व विहिरी पूर्णपणे प्रदूषित झाल्या. या जमिनी महामंडळाने संपादित करण्याची मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात आली. त्याची तत्काळ दखल घेत पालकमंत्री ठाकूर यांनी शासन स्तरावर ही मागणी पोहोचवली, तसेच राज्याचे उद्योगमंत्री सुभाष देसाई यांच्या उपस्थितीत, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांसमवेत स्वतंत्र बैठका घेऊन पाठपुरावा केला. नारायणपूर येथील जमीन समतल व औद्योगिक नियोजनाच्या दृष्टीने योग्य असल्याचे भूनिवड समितीला दिसून आले. अमरावती औद्योगिक क्षेत्रात उपलब्ध वीज उपकेंद्रातून याठिकाणी वीजपुरवठा होऊ शकेल. त्याचप्रमाणे, पाणीपुरवठा योजनेतून पाणीपुरवठा करता येणार आहे. या क्षेत्रालगत महामंडळाने २ हजार ८०९.७८ हेक्टर अतिरिक्त अमरावती औद्योगिक क्षेत्र विकसित केले आहे.

अनेक उद्योग तिथे सुरू झाले आहेत. प्रस्तावित जागाही संपादित होत असल्याने औद्योगिक वाढीला वाव मिळणार आहे. त्या अनुषंगाने स्थानिक पातळीवर मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मितीही होऊ शकेल. जिल्ह्यात नवनवे उद्योग यावेत, यासाठी सातत्याने प्रयत्न होत असल्याचेही पालकमंत्री ठाकूर यांनी सांगितले. ◀*(तभा वृत्तसेवा)*

गोमूत्र व शेणापासून आयुर्वेदिक औषध निर्मिती

◆ **देवळी, १ एप्रिल**

गावरान गाईचे गोमूत्र आणि शेणापासून तयार केलेल्या भुकटीचा वापर विविध आजारांमध्ये औषध म्हणून करता येऊ शकतो, असा प्रकल्प सालोड येथील महात्मा गांधी आयुर्वेदिक वैद्यकीय महाविद्यालयाने हाती घेतला आहे. महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. भारत राठी तसेच पदव्युत्तर शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी पढेगाव येथील सर्वोदय गोशाळेला भेट दिली.

सर्वोदय गोशाळेला भेट देताना प्राध्यापक डॉ. भारत राठी तसेच विद्यार्थिनी

यावेळी त्यांनी गोशाळेचे व्यवस्थापक वसंत पंचभाई आणि मनोज पंचभाई यांना संशोधन करण्याकरिता गोमूत्र व शेण उपलब्ध करून देण्याची विनंती केली.

विविध आजारांवरील उपचारांत गावरान गाईचे गोमूत्र व शेणाची उपयोगिता सिद्ध झालेली असून, गोमूत्र आणि शेणापासून भुकटी, टॅबलेट आणि पंचगव्य तयार करणार असल्याची माहिती डॉ. राठी यांनी यावेळी दिली. ◀*(तभा वृत्तसेवा)*

शेतमजुराची मुलगी झाली पोलिस उपनिरीक्षक

◆ **वरूड, १ एप्रिल**

तालुक्यातील एकदरा येथील शेतमजुरी करणारे साहेबराव बाबुराव काटोले यांच्या मुलीने जिद्द व चिकाटीने स्वबळावर अहोरात्र अभ्यास करून महाराष्ट्र लोकसेवा आयोग परीक्षेत उत्तीर्ण होऊन पोलिस उपनिरीक्षक बनण्याचे स्वप्न साकार केले आहे.

कुटुंबासोबत सत्कार स्वीकारताना वैशाली काटोले

याबद्दल संपूर्ण तालुक्यात तिचे कौतुक होत आहे. वैशालीचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळा व जागृत विद्यालय वरुड येथे झाले. ग्रामीण भागात उच्च शिक्षणाच्या कोणत्याही सोयीसुविधा उपलब्ध नसतांना तिने हे यश संपादन करणे म्हणजे खरोखर गौरवास्पद आहे. आनंदाचा क्षण म्हणून ग्रामपंचायत कार्यालय एकदरा येथे वैशाली काटोले हिचा गावकऱ्यांकडून सत्कार करण्यात आला. त्याप्रसंगी वैशालीने शिक्षणविषयीचे महत्त्व व अपयश हिच यशाची पहिली पायरी असून तरुणांनी खचून जाऊ नये, असे मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी ग्रामपंचायत पदाधिकारी व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ◀*(तभा वृत्तसेवा)*

कोटक महिंद्रा बँक लिमिटेड

kotak®

कॉर्पोरेट आयडेंटिटी क्र. एल६५११०एमएच१९८५पीएलसी०३८१३७

पंजिकृत कार्यालय : २७ बीकेसी, सी २७, जी ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्पलेक्स (ई), मुंबई-४०००५१ (महाराष्ट्र). कॉर्पोरेट कार्यालय : कोटक इन्फिनिटी, झोन-२, चौथा मजला, इमारत क्रमांक २१, इन्फिनिटी पार्क, इव्ह्यू ई हायवेच्या मागे, गोरेगाव, मुंबई - ४०००९७ (महाराष्ट्र). प्रादेशिक कार्यालय : ८, वेस्ट हायकोर्ट रोड, शंकर नगर, धरमपेठ, नागपूर, महाराष्ट्र ४४००१०, महाराष्ट्र.

लिलाव आणि विक्रीकरिता जाहीर सूचना

याद्वारे आम्ही सर्वसामान्य नागरिक आणि विशेषत: कर्जदार/सहकर्जदार आणि जमानतदारांना नोटीस जारी करीत आहोत की, खाली नमूद असलेल्या अचल संपत्तीचा कोटक महिंद्रा बँक लिमिटेडच्या अधिकारप्राप्त अधिकाऱ्याने सांकेतिक ताबा घेतला आहे. कोटक महिंद्रा बँक लिमिटेडच्या अधिकारप्राप्त अधिकाऱ्याने सांकेतिक ताबा घेतलेल्या या संपत्तीची विक्री आहे तिथेच, आहे त्याच स्वरूपात आणि आहे त्याच स्थितीत विक्री करण्यात येणार असून, यासाठी आम्ही आपल्या ई-ऑक्शन सर्व्हिस पार्टनर असलेल्या मेसर्स सी१ इंडिया प्रायव्हेट लिमिटेडच्या माध्यमातून **www.c1india.com** या संकेतस्थळावरून खाली नमूद संपत्तीच्या विक्रीसाठी ऑनलाईन निविदा मागवत आहोत. वर्णन खालीलप्रमाणे:-

कर्ज खाते क्र.	कर्जदार/सहकर्जदार/ जमानतदारांचे नाव	१३(२) डिमांड नोटीस दिनांक आणि रक्कम	अचल संपत्तीचे विवरण	राखीव किंमत	अनामत रक्कम (ईएमडी)
एलएपी१७९५०६४६ एलएपी ओडी२४१३५७४०६२	१. मेसर्स राठी एजन्सीज २. मेसर्स मधूर एजन्सीज ३. मेसर्स सूरज एन्टरप्रायझेस ४. मोहनलाल छगनलाल राठी ५. आशिष मोहनलाल राठी ६. श्रीमती राणी आशिष राठी	₹ १,६२,८३,३६८.३६ (रुपये एक कोटी बासस्ट लाख त्र्यांशी हजार तिनशे अडुसस्ट आणि छत्तीस पैसे) ०२.०९.२०२१ पर्यंतची देय्यरक्कम डिमांड नोटीसची तारीख : १७.०९.२०२१	प्लॉट क्र. ४, क्षेत्रफळ ३३०० चौरस फुट, एस. क्र. १६, विजय हाऊसिंग सोसायटी, शंकर नगर, गोरक्षण रोड, मौजा मल्कापूर, तहसिल व जिल्हा अकोला, महाराष्ट्र - ४४४००४, अधिकची माहिती विक्री पत्र क्र. ३४११/१९९५ दि. ०२.११.१९९५ मध्ये उपलब्ध आहे.	₹ २,८६,६८,१२४/- (रु. दोन कोटी छ्यान्नशी लाख अडुसस्ट हजार एकशे चोविस फक्त)	₹ २८,६६,८१२.४० (रु. अठ्ठाविस लाख सहासस्ट हजार आठशे बारा आणि ४० पैसे फक्त)
बोली वाढीतील रक्कम ₹ १,००,०००/-	लिलावाची तारीख आणि वेळ : १३.०५.२०२२ दुपारी १२.०० पासून ०३.०० वाजेपर्यंत. प्रस्ताव/ईएमडी सादर करण्याची शेवटची तारीख : १२.०५.२०२२ सायंकाळी पाच वाजेपर्यंत. अचल संपत्तीची पाहणी करण्यासाठी तारीख : २५.०४.२०२२. वेळ : सकाळी ११.०० ते दुपारी १२.०० पर्यंत.				

विक्रीच्या महत्त्वाच्या अटी व शर्ती : १) निविदा दस्तावेजातील विस्तारित शर्ती व अटी तसेच यासाठी निर्धारित असलेल्या कार्यवाहीनुसार लिलावाची प्रक्रिया केली जाणार आहे. निविदाधारक निविदा दस्तावेजांसाठी तसेच ई-लिलाव होणार असलेल्या संबंधित संपत्तीची आणि ऑनलाईन सादर करावयाच्या निविदा अर्जाची सविस्तर माहितीसाठी आमच्या ई-ऑक्शन सर्व्हिस प्रोव्हायडर असलेल्या **मेसर्स सी१ इंडिया प्रायव्हेट लिमिटेडच्या www.bankauctions.com** या संकेतस्थळावर भेट देऊ शकतात. **२)** सर्व इच्छूक खरेदीदार/निविदाधारकांना त्यांचे नाव वर नमूद असलेल्या **www. bankauctions.com** या संकेतस्थळावर नोंदविणे आवश्यक असून, यातून त्यांना उपरोक्त तारीख आणि वेळेत होणाऱ्या ई-लिलावात सहभागी होता यावे, यासाठी निशुल्क युझर आयडी व पासवर्ड प्राप्त करता येणार आहे. **३)** कोणतीही चौकशी, माहिती, आधार, कार्यवाही आणि ई-लिलावाचे ऑनलाईन प्रशिक्षण यासाठी संभाव्य निविदाधारक **मेसर्स सी १ इंडिया प्रा. लि.** आमच्या ई-लिलाव सेवा भागीदाराचा विभाग आणि **मेसर्स विनोद चौहान** यांच्याशी **टेलिफोन क्र. + ९१ ७२९१९७११२४, २५, २६ आणि मोबाईल क्र. ९८१३८८७९३१ तसेच ई-मेल आयडी : delhi@c1india.com & support@bankeauctions.com** यावर संपर्क करू शकतात. **४)** अधिकारप्राप्त अधिकाऱ्याकडे असलेल्या सर्वोत्तम माहिती आणि ज्ञानानुसार, या संपत्तीबाबत कोणतेही अडथळे नाहीत. तथापि, इच्छूक निविदाधारक आपली निविदा दाखल करण्यापूर्वी उपरोक्त नमूद असल्याप्रमाणे किंवा पूर्व परवानगीने इतर कोणत्याही दिवशी आणि वेळेत संबंधित संपत्तीची पाहणी करू शकतात आणि दस्तावेजही तपासू शकतात याशिवाय, या संपत्तीबाबत कोणतेही अडथळे आहेत की नाही आणि लिलावात असलेल्या संपत्तीची तसेच दावे/ हक्क/ ड्यूज याविषयीची तपासणी ते स्वतंत्रपणेही करू शकतात. ई-लिलावाच्या जाहिरातीत कोणतीही वचनबद्धता किंवा **केएमबीएल**चे प्रतिनिधित्व देत नाही. **केएमबीएल**च्या माहितीत असणारे किंवा नसलेल्या विद्यमान आणि भविष्यातील अडथळ्यांसह या संपत्तीची विक्री करण्यात येत आहे. खालील अधिकारप्राप्त अधिकारी/धनको हा कोणत्याही थर्ड पार्टी दावे/ हक्क/ ड्यूजसाठी कोणत्याही स्थितीत जबाबदार राहणार नाही. **५)** ई-लिलावात सहभागी होण्याकरिता इच्छूक खरेदीदार/निविदाधारकांनी वेब पोर्टलवर (**https A//www.bankauctions.com**) त्यांनी संबंधित संपत्तीसाठी **कोटक महिंद्रा बँक लि.** नागपूर/अकोला/मुंबई येथे देय असलेल्या डिमांड ड्रॉफ्टद्वारे भरलेल्या व्याजमुक्त परतावा रकमेचा अनामत ठेव (ईएमडी) ची सविस्तर माहिती तसेच पॅन कार्ड, आधार कार्डची स्व-साक्षांकित प्रत, कंपनीचा ठराव असल्यास त्याची प्रत आणि घराचा पत्ता सादर करावा.

कर्जदारांना/ गहाण ठेवणाऱ्यांना/ जामीनदारांना **सरफेसी कायद्याच्या नियम ६(२), ८(६) आणि ९(१) नियमानुसार वैधानिक ३० दिवसांची नोटीस** दिली आहे. या नोटीसच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत अद्ययावत व्याज आणि खर्चासह वर नमूद केल्याप्रमाणे देय पूर्ण करणे आणि या नोटीसच्या तारखेपासून **तीस दिवसांच्या आत** देय रक्कम अदा केली नाही तर वर नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसार सुरक्षित मालमत्ता विक्रीस काढली जाईल. इंग्रजी आणि स्थानिक वृत्तपत्रातील विक्री सूचनांच्या प्रकाशनांमध्ये काही तफावत आढळल्यास, अशा परिस्थितीत इंग्रजी वृत्तपत्र स्थानिक वृत्तपत्राची जागा घेतील आणि ती अंतिम प्रत मानली जाईल, त्यामुळे संदिग्धता दूर होईल. जर निर्देशित वेळेत कर्जदारांनी/गहाण ठेवणाऱ्यांनी/जामीनदारांनी बँककडे रक्कम जमा केली तर लिलाव रोखला जाऊ शकेल.

विक्रीविषयक सविस्तर माहिती, अटी आणि शर्ती जाणून घेण्यासाठी आमच्या अधिकृत संकेतस्थळाला **www.kotak.com/en/bank-auction.html** किंवा संबंधित अधिकारी श्री. रविंद्र द्विवेदी @ ७२०८०५१०८१ यांच्याशी वर उल्लेख केलेल्या बँकेच्या प्रादेशिक कार्यालयात संपर्क साधता येईल.

विशेष सूचना : ई-लिलाव कोटक महिंद्रा बँक लिमिटेड यांच्या वतीने (केएमबीएल) आमचे सेवा प्रदाते मेसर्स सी१ इंडिया प्रा. लि.यांच्यातर्फे आयोजित केला जाईल. तर बोलीदारांनी पूर्व-निर्दिष्ट तारखेला, त्यांच्या स्वत:च्या घरातून/कार्यालयातून/त्यांच्या बोलीच्या ठिकाणाहून त्यांच्या पसंतीनुसार आरक्षित किमतीच्या वर उद्धृत केले पाहिजे. इंटरनेट कनेक्टिव्हिटी आणि इतर सामग्रीची आवश्यकता बोलीदारांनी स्वत:च सुनिश्चित केली पाहिजे. इंटरनेट कनेक्टिव्हिटी आणि इतर सामग्रीची आवश्यकता बोलीदारांनी स्वत:च केली पाहिजे. कृपया लक्षात घ्या की इंटरनेट कनेक्टिव्हिटीमध्ये बिघाड (कोणत्याही कारणामुळे असो) ही संपूर्ण जबाबदारी बोलीदारांची असेल, केएमबीएल किंवा सी१ इंडिया प्रायव्हेट लि. या अनपेक्षित परिस्थितीसाठी जबाबदार नसेल. अशा आकस्मिक परिस्थितीपासून बचाव करण्यासाठी, बोलीदारांना विनंती केली जाते की त्यांनी आवश्यक त्या सर्व व्यवस्था/पर्याय जे आवश्यक आहे ते करावे जेणेकरून ते अशा परिस्थितीला तोंड देण्यास सक्षम असतील आणि तरीही ते यशस्वीरित्या ई-लिलावात सहभागी होऊ शकतील.

तथापि, अशी कोणतीही गुंतागुंतीची परिस्थिती टाळण्यासाठी बोलीदारांना विनंती आहे की त्यांनी आपली बोली उद्धृत करण्यासाठी/सुधारणा करण्यासाठी शेवटच्या क्षणापर्यंत थांबू नये.

तारीख: ०१: ०४.२०२२
.ठिकाण: अकोला, महाराष्ट्र

स्वाक्षरीकर्ता अधिकृत अधिकारी
कोटक महिंद्रा बँक लिमिटेडसाठी

उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी बाळापूर जि. अकोला यांचे कार्यालय

दूरध्वनी क्र. ०७२५७-२३२१३३ ई-मेल आय डी sdo.balapur@rediffmail.com

क्र/उविअ/शिरस्तेदार/कावि-४०९/२०२२ **दिनांक - १५/०३/२०२२**

अधिसूचना

(कलम ११)

भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३

प्रकरण क्रमांक एल.ए.क्यू.- ४७/अंत्री मलकापूर/५/२०२०-२१

ज्याअर्थी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (ज्याचा उल्लेख पुढे उक्त अधिनियम असा करण्यात आला आहे) च्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण ११/२०१४/ प्र.क्र. ७७/अ-२, दिनांक १९ जानेवारी, २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश उक्त अधिसूचना असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड अ) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील ५००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल; आणि

ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, अकोला जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यास यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमीन (यापुढे जिचा निर्देश उक्त जमीन असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, वाटते (ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोनमध्ये दिलेले आहे), आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे; आणि

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. ३८, दि. १३ मार्च, २०१५ अन्वये सिंचन प्रकल्पांना उक्त अधिनियमाच्या प्रकरण दोन व तीन यांच्या तरतुदी लागू करण्यापासून सूट देण्यात आली असल्यामुळे या प्रकल्पासाठी सामाजिक प्रभाव निर्धारण करण्याची आवश्यकता उरलेली नाही; आणि

ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ४३ च्या पोट कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल, या सोबत जोडलेल्या अनुसूची पाचमध्ये दिलेला आहे.

त्याअर्थी, आता असे घोषित करण्यात येते की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीत, कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल.

परंतु, आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुद्धिपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्याकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याच्या व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे त्यांचा निर्देश उक्त नियम असा करण्यात आला आहे) त्यांच्या नियम १० च्या उप नियम (३) द्वारे विहित केल्या प्रमाणे भूमि अभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचेदेखील घोषित करीत आहेत.

तसेच उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी, अकोला उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी भूसंपादन, तथा उपविभागीय अधिकारी बाळापूर यांस पदनिर्देशित केले आहे.

अनुसूची-एक

जमिनीचे वर्णन

गाव- अंत्री मलकापूर, ता. बाळापूर, जिल्हा-अकोला

अ.क्र.	भूमापन किंवा गट क्रमांक	अंदाजित क्षेत्र (हेक्टरमध्ये)
१	७२	०.४० हे.आर
	एकूण	०.४० हे.आर

अनुसूची-दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव - कारंजा रमजानपूर (नया अंदुरा) संग्राहक ल.पा. योजना, अंतर्गत मौजे अंत्री मलकापूर येथील स्मशानभूमी/दफनभूमीसाठी भूसंपादनाकरिता.

प्रकल्पाच्या कार्याचे वर्णन - कारंजा रमजानपूर (नया अंदुरा) संग्राहक ल. पा. योजना, ता. बाळापूर, जि. अकोला या प्रकल्पांतर्गत मौजे अंत्री मलकापूर येथील स्मशानभूमी/ दफनभूमीसाठी संपादनाकरिता

अनुसूची - तीन

बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे. - या प्रकल्पामुळे कोणतेही गाव बाधित होत नाही.

अनुसूची - चार

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. ३८ दिनांक - १३ मार्च, २०१५ अन्वये सिंचन प्रकल्पांना सामाजिक प्रभाव निर्धारणापासून सूट दिली असल्यामुळे सामाजिक प्रभाव निर्धारण करण्यात आलेले नाही. त्यामुळे त्याचा सारांश प्रकाशित करण्याच्या प्रश्न उद्भवत नाही.

अनुसूची - पाच

विस्थापन होत नसल्यामुळे व प्रशासकाची नेमणूक झालेली नसल्यामुळे माहिती निरंक.

स्वा/-
(डॉ. रामेश्वर पुरी)
उपविभागीय अधिकारी तथा
भूसंपादन अधिकारी बाळापूर

दिनांक :- १५/०३/२०२२
ठिकाण :- बाळापूर

जा.क्र./जिमाका/अकोला/जाहिरात/०१/२०२२